निशाणी क्र. २५

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०५ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नावः | – | इरफान जाफरमियाँ सौदागर |
| वय | – | ३७ वर्षे, व्यवसाय– हॉटेल चालक, |
| नेमणुक | – | शिवाजी नगर, निलंगा, ता.निलंगा, जि. लातूर. |

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

दि. १६.०५.२०२६ रोजी मी औसा येथे जात असताना पोलिसांनी मला मिना निंबाळकर पेट्रोल पंपाच्या समोर पंचनाम्याकरिता बोलवले होते. त्यावेळी माझ्यासोबत अजय श्रीमंत वाघे आणि सात पोलीस अधिकारी होते. पोलिसांसोबत आरोपी होते. आमच्या समोर आरोपीच्या खिशातून पोलिसांनी पैसे आणि एक पुडी काढली. त्या पुडीमध्ये आठ सोन्याच्या अंगठ्या, हातातील सोन्याच्या दोन लहान आकाराच्या राख्या आणि कानातील झुमके होते. पाचशेच्या २० नोटा असे एकूण १०,०००/– रुपये आरोपीच्या खिशातून जप्त केले होते. पोलिसांनी आमच्यासमक्ष त्या वस्तु जप्त करुन जप्ती पंचनामा लिहीला. तो पंचनामा मी वाचला. त्याच्यावर सही केली. (आता मला दि.१६.०५.२०२६ रोजीची जप्ती पंचनाम्याची सत्यप्रत दाखवण्यात आला.) त्या पंचनाम्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्यावर माझी व दुसरे पंच अजय वाघे आणि पोलिस हासबे तसेच आरोपीची सही आहे. तसेच त्याच्यावर आरोपीचा अंगठा आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यास **निशाणी क्र.२६** देण्यात आली. मला त्या जप्त सोन्याचे दागिणे आणि पैसे

दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला प्रस्तुत गुन्हयातील मुद्देमाल व्ही.एम.आर नं.६९/२०२६ मधील सोन्याची अंगठी व पाचशे रुपयांच्या वीस नोटा दाखवण्यात आल्या.) ती सोन्याची अंगठी व पाचशे रुपयांच्या वीस नोटा आरोपीकडून जप्त केल्या आहेत. ज्या आरोपीकडून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला त्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. (साक्षीदाराने व्ही.सी. द्वारे हजर असलेल्या आरोपीकडे निर्देशित करुन तो व्यक्ती आरोपी असल्याचे सांगितले.)

**उलटतपास आरोपीतर्फे अॅड.के.एम.पवार यांच्यामार्फत सुरु –**

२. मी आज पहिल्यांदा न्यायालयात साक्ष देत आहे. माझ्याविरुध्द जुगार कायद्याखालील गुन्हे दाखल नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसाच्या सांगण्यावरुन ब–याच कामात जप्ती पंच म्हणून सही केलेली आहे. अजय वाघे हा माझा मित्र आहे. तो पंचनामा दिड तास चालु होता. जप्ती पंचनाम्यामध्ये पोलिसांनी आमच्याकडे अंगझडती दिली होती. मी आणि अजय वाघे यांनी अंगझडती दिली नव्हती. पोलिसांनी मागे पुढे असे दोन पाने जप्ती पंचनामा केला होता. आरोपीचे घर माझ्या घरासमोर आहे. जप्ती पंचनामा मिना निंबाळकर पेट्रोलपंपाच्या समोर झाला होता. मला १२.४५ च्या सुमारास पोलिसांनी मी औसा येथे जात असताना थांबवले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. जप्त सोन्याची अंगठी व पाचशे रुपयांच्या वीस नोटा या आरोपीकडून जप्त केलेल्या आहेत हे ओळखण्यासाठी त्याच्यावर विशिष्ट खुण नाही. त्या नोटा आणि अंगठी पोलिसांनी माझ्यासमक्ष सिल केली नव्हती. त्या नोंटांचे नंबर पोलिसांनी लिहून घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस

खोटया गुन्ह्यामध्ये अडकवण्यासाठी त्या नोटा आणि अंगठी आरोपीकडून जप्त केलेली होती असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरुध्द अनेक जुगारबंदी कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर जप्ती पंचनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

**सदर साक्षीदारचा जबाब आरोपीस व्ही.सी द्वारे हजर केल्यानंतर नोंदवण्यात आला. सदर जबाब नोंदवतेवेळी ऑडिओ व व्हीडीओ सुस्थितीत चालु होता.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.07.31 17:38:43 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–३१/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा